**<u>प्रेस नोट</u>** दिनांक २४/०३/२०२५

**श्री अप्पासाहेब किसनराव तोडे, वय ५६ वर्षे, पद शाखा अभियंता, पंचायत समिती, परभणी, रा. यशोधन नगर, परभणी. (वर्ग ३, ग्रामविकास विभाग) हे १०,०००/- रूपयांची लाच स्विकारले प्रकरणी अॅसीबीच्या जाळ्यात**

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे नवामोंढा गुरनं.१०४/२०२५ कलम ७ भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.२४.०३.२०२५ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | श्री अप्पासाहेब किसनराव तोडे, वय ५६ वर्षे, पद शाखा अभियंता, पंचायत समिती, परभणी, रा. यशोधन नगर,परभणी. (वर्ग ३, ग्रामविकास विभाग) |
| लाचेची रक्कम | १०,०००/- रूपये |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी १५ वा वित्त आयोगामध्ये अंगणवाडी येथील कंपाऊंड वॉल आणि नाली बांधकाम केले आहे. सदर बांधकामाचे एमबी लिहण्यासाठी पंचायत समिती परभणी येथे कागदपत्र सादर केलेले आहेत. दिनांक ०४/०३/२०२५ रोजी लोकसेवक अप्पासाहेब किसनराव तोडे यांना तक्रारदार भेटले. त्यांनी कंपाऊंड वॉल आणि नाली बांधकामाचे एमबी लिहण्यासाठी १०,००० रु द्यावे लागतील असे सांगितले. सदर रक्कम ही लाच असून ती तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०४/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी येथे तक्रार दिली होती.

दि.१८/०३/२०२५ रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, लोकसेवक अप्पासाहेब किसनराव तोडे यांनी तक्रारदार यांना त्यांचे गावातील अंगणवाडी कंपाऊंड वॉलचे आणि नाली बांधकामाचे एमबी लिहून तक्रारदार यांच्या ताब्यात दिले. सदर अंगणवाडी कंपाऊंड वॉलचे आणि नाली बांधकामाची रक्कम तुमच्या खात्यात जमा झाल्यानंतर १०००० रुपये आणून द्यावे लागतील असे म्हणून लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवली आहे.

तक्रारदार यांचे बँक खात्यात अंगणवाडी कंपाऊंड वॉल आणि नाली बांधकामाचे पैसे जमा झाल्याने दिनांक २४/०३/२०२५ रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक अप्पासाहेब किसनराव तोडे यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेली १०००० रु लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली आहे. आरोपी लोकसेवक अप्पासाहेब किसनराव तोडे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले म्हणुन गुन्हा दाखल आहे.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची सापळा कार्यवाही श्रीमती.माधुरी यावलीकर, पोलीस निरीक्षक, एसीबी नांदेड, सपोउपनि मिलपत्रेवार , पोह अनिरुद्ध कुलकर्णी, सीमा चाटे, पो.अंमलदार अतुल कदम,नामदेव आदमे चापोह जे.जे.कदम, नरवाडे सर्व लाप्रवि,परभणी. पोलीस अंमलदार ईश्वर जाधव, शाम गोरपल्ले, चापोशि नामपल्ले सर्व लाप्रवि नांदेड |
| सापळा व तपास अधिकारी | श्री.अशोक इप्पर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि परभणी. ९२७२१११०६४ |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार,नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फी क्रमांक:- 1064 ऑनलाईन अॅप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| 9272111064 | |

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी

Scanned with OKEN Scanner